भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2022 ◐ BT 705407

जिल्हा कोषागार जळगाव
प्रमाणित करण्यात आलेला आहे
23 FEB 2023
द्रांक प्रमुख लिपीक जळगांव

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव यांच्यामधील सामंजस्य करार

## पार्श्वभूमी:

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत युवकांच्या करिअरला योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने राज्यातल्या निवडक महाविद्यालयांमध्ये "CENTER OF EXCELLENCE" उभे केले जाणार आहेत. या पाठीमागील महत्वाची भूमिका अशी की, राज्यांमध्ये स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी मोठ्या प्रमाणात मुले शहरी भागांमध्ये स्थलांतरित होत असतात. जीवनातील उमेदीच्या काळातील अनेक वर्ष केवळ स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी घरापासून, गावापासून, पालकांपासून लांब राहणाऱ्या मुलांमध्ये मोठ्या प्रमाणात नैराश्याचे वातावरण तयार होते. याचे प्रमाण राज्यांमध्ये लाखोंच्या घरात आहे. खाजगी प्रशिक्षण संस्थांचे उद्देश वेगवेगळे असल्यामुळे सरसकट सर्व मुलांना प्रोत्साहन देऊन यामध्ये गुंतवून ठेवण्याचा एक प्रयत्न होत असतो आणि मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातील पालक व विद्यार्थी या दुष्टचक्रात



जळगांव

प्राचार्य
डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे
महिला महाविद्यालय,जळगाव

दस्ताचा प्रकार/अनुच्छेद क्रमांक M एम. ओ. यू.
दस्त नोंदणी करणार आहेत का? होय/नाही
नोंदणी होणार असल्यास कार्यालयाचे नाव - सह दुय्यम निबंधक-
मिळकतीचे वर्णन
मोबदला रक्कम
मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव व पत्ता प्राचार्य, डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महीला
दुसऱ्या पक्षकाराचे नाव महाविद्यालय जळगांव
हस्ते असल्यास त्यांचे नाव व पत्ता श्री. राजू तापडे, जळगांव
मुद्रांक शुल्क रक्कम ५००/-
मुद्रांक विक्री नोंदवही अनु.क्र. ९५६ दि. १६/०४/2023
मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही
परवाना धारक मुद्रांक विक्रेत्याची सही
परवाना क्र. ५३०१००५

एन.बी.कुळकर्णी
२७, समर्थ कॉलनी एम.जे.कॉलेज
रोड, जळगांव मो.९८९२११६४६६

अडकतात. स्पर्धा परीक्षेचे नियोजन करत असताना स्वतःच्या करिअरसाठी एक "प्लॅन बी" देखील तितका सक्षमपणे तयार ठेवला पाहिजे आणि एका योग्य वयानंतर करिअरचा मार्ग बदलून योग्य निर्णय घेतला पाहिजे, याचे मार्गदर्शन देण्याची यंत्रणा उभे करणे हा सेंटर स्थापनेमागील महत्त्वाचा उद्देश आहे. याबाबत कट्ट्या अंतर्गत **महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव** यांच्यामध्ये असणारा सामंजस्य करार पुढील प्रमाणे:

**पार्टी नंबर १**
**यशवंत शितोळे**
अध्यक्ष
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र
**पत्ता:** करिअर कट्टा, महिला बँक तळमजला, खासबाग मैदानाजवळ,
मंगळवार पेठ, कोल्हापूर-१२

पार्टी नंबर २
**प्रा. डॉ. गौरी मिलिंद राणे**
**प्राचार्य, डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय,**
**पत्ता:** जिल्हा पेठ,जिल्हा रोड, जळगाव, महाराष्ट्र - 425001

Jasswant

Govt. Of Maha. Regd. No. MH - 22840



जळगांव

प्राचार्य
डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे
महिला महाविद्यालय

संकल्पना:

महाराष्ट्र राज्य शासनाकडून सध्या राज्यभरामध्ये सहा ठिकाणी "Pre IAS Training" सेंटरच्या माध्यमातून 740 विद्यार्थ्यांच्या निवासी प्रशिक्षणाची यंत्रणा अस्तित्वात आहे. करिअर कट्ट्याच्या माध्यमातून राज्यभरामध्ये 10,000 विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठीची व्यवस्था निर्माण करणे तसेच राज्यातील महाविद्यालयांमध्ये उद्योजकीय संस्कार घडावेत व उद्योग-व्यवसाय निर्माण करणारी युवा पिढी पुढे यावी, या उद्देशाने 5000 युवा उद्योजकांना महाविद्यालयीन स्तरावर उद्योजकीय विकासासाठी आवश्यक कार्यालयीन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येईल. "CENTER OF EXCELLENCE" च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शहरातील स्थलांतर कमी करण्याचा तसेच नगण्य शुल्क आकारून विद्यार्थी आणि पालकांना स्थानिक पातळीवर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, विद्यार्थी व पालकांसाठी तज्ञांकडून समुपदेशन केले जाईल. उद्योग क्षेत्रामध्ये तसेच व्यावसायिक क्षेत्रांमध्ये ज्यांनी आपलं कर्तृत्व सिद्ध केले आहे, अशा कर्तृत्व संपन्न व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली, नियंत्रणाखाली CENTER OF EXCELLENCE कार्यरत राहील.

### 1) स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी व अभ्यासिका:

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे MPSC परीक्षेसाठी तयारीचे प्रमाण व UPSC, केंद्र शासनाच्या वेगवेगळ्या नोकऱ्यांसाठी असणारे प्रमाण बघता महाराष्ट्रीयन विद्यार्थी तुलनात्मकदृष्ट्या केंद्र शासनाच्या नोकरीमध्ये कमी प्रमाणात तयारी करत असल्याचे लक्षात येते. यासाठी SSC & SSB याची माहिती विद्यार्थ्यांना योग्य वेळी झाली पाहिजे, त्याच्या तयारीसाठी अभ्यासवर्ग व प्रशिक्षण उपलब्ध झाले पाहिजे तसेच हे सर्व करत असताना त्याच्या राहत्या ठिकाणापासून शक्य तितक्याजवळ या गोष्टी उपलब्ध होतील, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. जास्त विद्यार्थी संख्या असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये १०० विद्यार्थ्यांची अभ्यासिका जी पूर्णवेळ विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असेल. सदर अभ्यासिकेमध्ये ऑनलाईन लेक्चरची सुविधा असेल ज्यामध्ये केंद्रीय पद्धतीने संपूर्ण राज्यात एकाच वेळेला सर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये



डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे
महिला महाविद्यालय जळगाव

तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाईल. आवश्यकता भासल्यास दिल्ली, मुंबई, पुणे या ठिकाणच्या तज्ञ व अनुभवी प्रशिक्षकांची नियुक्तीदेखील करण्यात येईल.

CENTER OF EXCELLENCE या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सदर भरती प्रक्रियेसाठी निघालेल्या जाहिरातीची माहिती देणे, योग्य पद्धतीने कागदपत्रांची पूर्तता करून घेणे, त्यांचे फॉर्म भरणे आणि परीक्षेची पूर्वतयारी करून घेणे तसेच ज्या ज्या ठिकाणी आवश्यकता आहे त्या ठिकाणी तज्ञ व्यक्तींकडून मुलाखतीची तयारी करून घेणे या पद्धतीचे उपक्रम राबवले जातील. वेगवेगळ्या परीक्षांचे फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी **सुविधा केंद्र** उपलब्ध असेल. विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन समुपदेशनासाठी सोय असेल. विद्यार्थी व पालकांची मागणी असल्यास समुपदेशनासाठी स्वतंत्र सेशनचे नियोजन करण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व शारीरिक क्षमतेचा विचार करता त्यांना स्पर्धा परीक्षा ऐवजी अन्य क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणे शक्य असल्यास याबाबत देखील मार्गदर्शन केले जाईल.

**गुणवत्ता व नियंत्रण:**

1) 1000 पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या महाविद्यालयांमध्ये तसेच ज्या परिसरामध्ये एक 1500 पेक्षा जास्त विद्यार्थी पदवीच्या पहिल्या वर्षाला असतील त्या परिसरामध्ये CENTER OF EXCELLENCE उभारण्यात येत आहे.

2) या सेंटरमध्ये 100 विद्यार्थी एकाच वेळी अभ्यास करू शकतील, अशी अभ्यासिकेची रचना करण्यात येईल. त्यासाठी लागणारे बेंचेस, लेक्चरसाठीचे interactive board असतील.

3) सोबत Common Facility Center असेल ज्यामध्ये संगणक उपलब्ध करून विद्यार्थी आपले कागदपत्र स्कॅन करणे, परीक्षेचे फॉर्म भरणे, हॉल तिकीट generate करणे, प्रिंट काढणे या सोयी असतील.



Govt. Of Maha. Regd. No. MH - 22640

Yaswant

जळगांव

प्राचार्य
डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे
महिला महाविद्यालय, जळगांव

4) या सेंटरमध्ये SSC/SSB/UPSC/MPSC या सर्व स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण चालतील व इतर वेळेला विद्यार्थी अभ्यासिकेत बसून स्वयं अध्ययन करतील.

5) अभ्यासिका सकाळी 06.00 ते संध्याकाळी 08.00 वाजेपर्यंत चालू असेल. यामध्ये संध्याकाळी 05.00 ते 08.00 online प्रशिक्षण असेल.

6) अभ्यासिकेचा मासिक खर्च निघावा यासाठी अग्रणी महाविद्यालय काही शुल्क करू शकतील, पण या माध्यमातून शुल्क ठरवत असताना क्लस्टरमध्ये येणाऱ्या महाविद्यालयाचे प्राचार्य व समन्वयक यांच्याशी सल्लामसलत करून ठरवावे.

7) या सेंटरमध्ये विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर जसा फोकस असेल त्याचप्रमाणे त्या विद्यार्थ्यांच्या मानसिकतेकडेही लक्ष देण्यात येईल. यासाठी विद्यार्थ्यांची Psychology Test घेण्यात येईल. यातून तो विद्यार्थी कोणत्या स्पर्धा परीक्षेसाठी तयार आहे हे कळेल. ऑनलाइन समुपदेशनाच्या माध्यमातून पालकांना आणि विद्यार्थ्यांना समुपदेशन करतील. परंतु कोणाला वैयक्तिक समुपदेशन हवे असल्यास पालकांच्या मागणीप्रमाणे वैयक्तिक समुपदेशनही करण्यात येईल.

**२) उद्योजकता विकास केंद्र:**

राज्यात सद्यस्थितीला उद्योजकीय कौशल्य वाढीसाठी आवश्यक अशी व्यवस्था अस्तित्वात नाही. Entrepreneurship Development Cell, Incubation Center हे प्रत्येक महाविद्यालयामध्ये असावे असा राज्य व केंद्र शासनाच्या धोरणांमध्ये झालेल्या बदल विचारात घेता महाविद्यालयीन व्यवस्थापन, प्राध्यापक, प्राचार्य यांच्यापर्यंत हा विचार प्रभावीपणे पोहोचवणे आणि उद्योग क्षेत्रातील यशस्वी उद्योजकांच्या, संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या व बँक प्रशासनाच्या माध्यमातून महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, त्यांचा उद्योजकीय विकासाला चालना देणे या उद्देशाने महाविद्यालयीन स्तरावर प्रत्येक सेंटरमध्ये 50 विद्यार्थ्यांच्या Student Start-up च्या कामकाजासाठी कार्यालयीन व्यवस्था उपलब्ध करून देणे हा CENTREOF EXCELLENCE चा महत्त्वाचा उद्देश आहे.

Govt. Of Maha. Regd. No. MH-22640



प्राचार्य
डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे
महिला महाविद्यालय, जळगांव

विद्यार्थ्यांच्या उद्योजकीय संकल्पनांना विस्तारणासाठी आवश्यक असणाऱ्या व्यावसायिक सल्लागार व्यक्तींची उपलब्धता विद्यार्थ्यांना करून देणे, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर चालणाऱ्या उद्योजकीय बदलांविषयी, तंत्रज्ञानाविषयी आणि कायद्याविषयी त्यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करून देणे, विद्यार्थी आणि उद्योजक यांचा सातत्याने संवाद आयोजित करून त्या माध्यमातून उद्योग जगतातील घडामोडी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवत असतानाच त्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यासाठी CENTER OF EXCELLENCE कार्यरत असेल. विद्यार्थ्यांच्या राजकीय नेतृत्वाच्या विकासासाठी विद्यार्थी संसद ज्या पद्धतीने कार्य करते त्याच पद्धतीने उद्योजकीय नेतृत्व विकासासाठी प्रत्येक सेंटरमध्ये "Student Start-up Company" नोंदणीकृत असेल आणि विद्यार्थी संसदेमधील मंत्रिमंडळाप्रमाणेच या कंपनीमधील व्यवस्थापकीय प्रमुख, आर्थिक व्यवस्थापक प्रमुख, या पद्धतीच्या वेगवेगळया पदांवर काम करण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना यावा, यासाठी Student Start-up ला गती देण्यात येईल.

## उद्देश:

1) जे विद्यार्थी स्पर्धा परीक्षा पास होऊ शकत नाहीत त्या विद्यार्थ्यांसाठी या सेंटरमध्ये उद्योजकता विकास हा उपक्रम राबविण्यात येईल.

2) यामध्ये 50 विद्यार्थ्यांना ऑफिस चालवण्यासाठी लागणारा set up उपलब्ध करून देण्यात येईल. त्यामध्ये conference room, desk व इतर सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

3) 1 वर्ष हे विद्यार्थी student start up म्हणून काम करतील. या विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी महाविद्यालयाबरोबर नोंदणी करून स्टार्टअप चालू करणार असतील त्यांना रुपये 1,00,000/- देण्यात येतील.



प्राचार्य
डॉ. अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे
महिला महाविद्यालय, जळगांव

4) महाविद्यालयाला लागणाऱ्या सुविधा उपलब्ध करणे, ग्रामीण भागातील वस्तू शहरी भागात उपलब्ध करून देणे व शहरी भागातील वस्तू ग्रामीण भागात उपलब्ध करून देणे या प्रक्रियेमुळे एक Interconnected Hub निर्माण होऊ शकते व यातूनच विद्यार्थी उद्योग कसा करावा, हे समजू शिकतील.

5) यामध्ये जे विद्यार्थी प्रत्यक्ष कार्यानुभव घेतील त्यांना अनुभव प्रमाणपत्र देण्यात येईल.

6) यामध्ये विद्यार्थी Branding, Packaging, logo making, Service provider model, IPR formalities, Time management, decision making या सर्व गोष्टी शिकतील.

**गुणवत्ता व नियंत्रण:**

1) या सगळ्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्या भागातील प्रसिद्ध उद्योजक सल्लागार समितीवर कार्यरत असतील.

2) विद्यार्थ्यांसाठी आठवड्यातून एकदा मार्गदर्शन करण्यात येईल, ज्यामध्ये-

पहिला आठवडा:- बँकेच्या अधिकारी बँकांच्या योजना सांगतील.

दुसरा आठवडा:- जिल्ह्यातील उद्योग केंद्राचे अधिकारी मार्गदर्शन शासकीय योजना सांगतील.

तिसरा आठवडा:- प्रायव्हेट कन्सल्टंट यांचे मार्गदर्शन करतील.

चौथा आठवडा:- आंतरराष्ट्रीय उद्योजक ऑनलाईन मार्गदर्शन करतील.

नियम व अटी:

1) क्लस्टरमध्ये सहभागी असणाऱ्या सर्व महाविद्यालयातील पदवीच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेणारे सर्व विद्यार्थी करिअर कट्ट्याला नोंदणी करणे आवश्यक आहे, याची जबाबदारी अग्रणी महाविद्यालयाच्या समन्वयकांची असेल.

2) CENTER OF EXCELLENCE चे निर्णय घेत असताना क्लस्टरमध्ये सहभागी महाविद्यालय समन्वयक व प्राचार्य, तसेच अग्रणी महाविद्यालयाचे समन्वयक प्राचार्य, त्या जिल्ह्याचे प्राचार्य प्रवर्तक तसेच जिल्हा समन्वयक, भागातील एक यशस्वी उद्योजक, निवृत्त प्रशासकीय अधिकारी व विद्यार्थी प्रतिनिधी या सर्वांचा समावेश असलेल्या स्थानिक नियामक मंडळाच्या बैठकीत संगणमताने घेण्यात यावेत.

CENTER OF EXCELLENCE नियामक मंडळ:

1) प्राचार्य प्रवर्तक
2) जिल्हा समन्वयक
3) क्लस्टर मधील सहभागी महाविद्यालयाचे प्राचार्य
4) क्लस्टर मधील सहभागी महाविद्यालयाचे समन्वयक
5) अग्रणी महाविद्यालयाचे प्राचार्य
6) अग्रणी महाविद्यालयाचे समन्वयक
7) यशस्वी उद्योजक
8) निवृत्त प्रशासकीय अधिकारी
9) विद्यार्थी प्रतिनिधी

Govt. Of Maha. Regd. No. MH - 22640



प्राचार्य
डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे
महिला महाविद्यालय, जळगाव

7) CENTER OF EXCELLENCE अंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या Incubation Center साठी क्लस्टर मधून नियमक मंडळाने 15 विद्यार्थ्यांची निवड स्टुडन्ट स्टार्टअप कंपनीचे पदाधिकारी म्हणून करावी.

8) Incubation Center चे पदाधिकारी म्हणून निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या नियोजित व्यवसायाची निवड करण्यासाठी नियामक मंडळ व निवडलेले पदाधिकारी यांनी वेगवेगळ्या संकल्पनांचे सादरीकरण घेऊन त्यामधून एका व्यवसायाची निवड करावी.

9) सदर निधी मधील 15 टक्के भाग हा व्यवस्थापकीय खर्चावर खर्च करता येईल उर्वरित 85% भाग हा व्यवसायाचे मुख्य उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी वापरला जाणे आवश्यक आहे.

10) सदर व्यवसाय करत असताना महाविद्यालय करिअर कट्टा यांची आर्थिक जबाबदारी उपलब्ध करून दिलेल्या भांडवला इतकीच मर्यादित राहील. याव्यतिरिक्त कोणत्याही पद्धतीची आर्थिक जबाबदारी/ दायित्व व्यवसायातून पदाधिकाऱ्यांनी निर्माण केल्यास त्याची जबाबदारी त्यांची वैयक्तिक राहील.

11) CENTER OF EXCELLENCE अंतर्गत येणाऱ्या Incubation Center ला नियमक मंडळांनी मान्यता दिलेल्या व्यवसायासाठी कोणत्याही पद्धतीचे कर्ज घेता येणार नाही.

12) महाविद्यालयाच्या आवारामध्ये व्यवसाय करत असताना त्या व्यवसायाचा कोणत्याही पद्धतीचा त्रास महाविद्यालयाच्या नियमित कामकाजास होणार नाही याची दक्षता व पदाधिकाऱ्यांनी घ्यावयाची आहे, तसेच सदर व्यवसाय करत असताना कोणत्याही समाजविघातक गोष्टींना प्रोत्साहन मिळेल अशा बाबींचा समावेश व्यवसायामध्ये असू नये.

13) मागील वर्षी दिलेला निधी वापरून केलेल्या व्यवसायातून काही नफा निवडलेल्या पदाधिकाऱ्यांनी मिळवला असल्यास त्याचे वितरण तीन समान भागांमध्ये करण्यात येईल यामध्ये विद्यार्थी पदाधिकारी, करिअर कट्टा व महाविद्यालय यांचा समावेश असेल.



Maharashtra Information Technology Support Centre, Govt. Of Maha. Regd. No. MH-22640

जळगांव

प्राचार्य
डॉ. [illegible] बेंडाळे
महिला महाविद्यालय, जळगांव

3) करिअर कट्ट्या अंतर्गत CENTER OF EXCELLENCE चालवत असताना 100 विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका उभी करण्यासाठी जो ₹10,00,000/- निधी दिला जाणार आहे. त्याची वितरण नियमावली पुढील प्रमाणे-

1) प्रतिवर्षी 20% (₹ 2,00,000) या पद्धतीने निधी वितरण होईल.

2) पुस्तके, फर्निचर, डिजिटल साधनसामग्री (interactive board/sound system) याचा प्राधान्यक्रम ठरवण्याचा अधिकार महाविद्यालयाचा असेल.

3) निधी वितरित करत असताना क्लस्टर मध्ये असलेल्या करिअर कट्टा मधील सहभागी असणाऱ्या विद्यार्थी संख्येवर निधी वितरणाचे गुणोत्तर अवलंबून असेल.

4) करिअर कट्ट्याकडून केंद्रीय पद्धतीने वस्तू खरेदी करून महाविद्यालयास वितरित केल्या जातील, यासाठी करिअर कट्ट्याने स्थापन केलेली खरेदी समिती निर्णय घेईल.

5) CENTER OF EXCELLENCE साठी दिलेली जागा (अभ्यासिका/ Incubation Center) ही पूर्ण वेळ त्याच उद्देशासाठी वापरली जाणे आवश्यक आहे.

6) CENTER OF EXCELLENCE मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण हे खालीलप्रमाणे:

50% जागा या अग्रणी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी,

20% जागा या pass out विद्यार्थ्यांसाठी,

30% जागा या आजूबाजूच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी असतील.

Govt. Of Maha. Regd. No. MH - 22640



प्राचार्य
डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे
महिला महाविद्यालय जळगांव

14) सदर निधी वापरून केलेल्या व्यवसायामध्ये 100% तोटा झाल्यास कोणत्याही पद्धतीची वसुली विद्यार्थी पदाधिकारी किंवा महाविद्यालय यांच्याकडून केली जाणार नाही, तसेच पुढच्या वर्षी दिल्या जाणाऱ्या निधीवर त्याचा कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही.

15) महाविद्यालयाच्या प्रयत्नांमुळे सदर विद्यार्थ्यांनी केलेले व्यवसायामध्ये झालेल्या नफ्यातील करिअर कट्ट्याला मिळालेल्या नफ्याच्या हिश्यातील 50 % रक्कम पुढील वर्षी दिल्या जाणाऱ्या 1,00,000 रुपये निधीमध्ये वाढवून दिले जातील.

16) सदर व्यवसाय करत असताना विद्यार्थ्यांना व्यवसायासाठी आवश्यक कायदेशीर बाबी, बाजारपेठेची माहिती, तसेच आर्थिक व्यवहार करत असताना घ्यावयाची काळजी याविषयी त्यांना सुरुवातीलाच प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

17) Revenue generate झाल्यावर त्यातील काही भाग लीड महाविद्यालयाचा असेल.

18) CSR/उद्योग मंत्रालय/Skill development याचा Additional fund महाविद्यालयाला उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असेल.

19) महाविद्यालयाच्या प्राधान्याप्रमाणे त्यांचे सभा घेऊन, त्यांची गरज पाहून त्यांना सेंटर चालू करण्यासाठी लागणारी उपकरणे उपलब्ध करून दिली जातील.

वरील प्रमाणे सर्व प्रक्रिया पूर्ण करून परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षा विषयी तसेच उद्योजकता विकास विषयी योग्य प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने सेंटर चालवत असताना महाविद्यालय व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे राहतील:

Yashwant

Maharashtra Information Technology Support Centre Govt. Of Maha. Regd. No. MH - 22640

जळगांव

डॉ. ... जी. डी. बेंडाळे
... महाविद्यालय, जळगांव

*** MITSC ची जबाबदारी:**

१) सेंटर ऑफ एक्सलन्स मध्ये सहभागी असणाऱ्या अग्रणी महाविद्यालयांना फर्निचर, पुस्तके, डिजीटल साधनसामग्री ( Interactive Board, sound systems) साठी उपलब्ध करुन देणे, निधी उपलब्ध करुन देणे.

२) सेंटर ऑफ एक्सलन्समधील कामकाज सुरळीत चालण्यासाठी आवश्यक त्या भेटी देणे.

३) सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये चालणाऱ्या कामकाजांवर नियमन आणि नियंत्रण ठेवणे.

४) सेंटर ऑफ एक्सलन्समधील विद्यार्थ्यांच्यासाठी ऑनलाईन पद्धतीने सर्व पद्धतीचे प्रशिक्षक उपलब्ध करून देणे.

५) सेंटर ऑफ एक्सलन्स आणि शासन/ विभाग यामध्ये समन्वयक म्हणून कार्य करणे.

६) महाविद्यालयाने नमेलेल्या सेंटर ऑफ एक्सलन्स समितीच्या सभा घेणे आणि आवश्यक तेथे निर्णयांस सहाय्य करणे.

७) सेंटर ऑफ एक्सलन्ससाठी उपलब्ध करुन दिलेल्या निधीचा वापर योग्य त्या कारणासाठी/ उद्देशपूर्तीसाठी होण्याकरिता यावर नियंत्रण ठेवणे.

८) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण हितासाठी आवश्यक असे विद्यार्थी हिताचे निर्णय घेणे.

*** महाविद्यालयाची जबाबदारी:**

१) सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये सहभागी असणाऱ्या अग्रणी महाविद्यालयातील पदवीच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी करिअर कट्ट्याची नोंदणी करुन घेण्याची जबाबदारी अग्रणी महाविद्यालयाची असेल.

Govt. Of Maha. Regd. No. MH - 22640



जळगांव

प्राचार्य
डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे
महिला महाविद्यालय, जळगाव

२) सेंटर ऑफ एक्सलन्ससाठी आवश्यक अशा अभ्यासिका, Common Facility Center, Entrepreneurship Development Cell/ Incubation Center तयार करुन घेणे आणि त्याचा पूर्णवेळ वापर त्याच कामासाठी करणे.

४) सेंटर ऑफ एक्सलन्ससाठी करिअर कट्ट्यामार्फत दिलेल्या साहित्याची ( फर्निचर, पुस्तके, डिजीटल साधनसामग्री (Interactive Board, sound systems) देखभाल आणि आवश्कतेनुसार दुरुस्ती करणे.

५) करिअर कट्ट्यामार्फत वेळोवेळी मागवले जाणारे विविध रिपोर्ट वेळेत सादर करणे.

६) करिअर कट्ट्याने ठरवून दिल्याप्रमाणे सेंटर ऑफ एक्सलन्ससाठी समिती नेमणे, त्यांच्या नियमित सभा घेणे आणि त्याविषयी वेळोवेळी माहिती देणे.

७) अग्रणी महाविद्यालयाने परिसरातील इतर महाविद्यालये आणि करिअर कट्टा यामध्ये समन्वयक म्हणून काम करणे.

८) करिअर कट्ट्यातंर्गत सेंटर ऑफ एक्सलन्स सुरू करणेसाठी महाविद्यालयाच्या संस्थेची परवानगी आणि इतर बाबींची पूर्तता करून घेणे.

**कालावधी:**

सदर सामंजस्य करार नोंदणी तारखेपासून ६० **महिन्याच्या** कालावधीसाठी आहे.

**न्यायालयीन कार्यक्षेत्र :**

सदर सामंजस्य करारांतर्गत उद्भवलेल्या कोणत्याही कायदेशीर समस्येसाठी न्यायालयीन प्रक्रियेसाठी कोल्हापूर जिल्हा न्यायालय हे कार्यक्षेत्र असेल.

Govt. Of Maha. Regd. No. MH - 22640

प्राचार्य
डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे
महिला महाविद्यालय,जळगांव

## दुरुस्ती व बदल :

सदर सामंजस्य करारांतर्गत नियम अटी व कार्यपद्धतीमध्ये काळानुरूप विद्यार्थी हितासाठी काही बदल करावयाचे झाल्यास दोघांच्या संमतीने स्वतंत्र परिशिष्टाचा समावेश करून बदल करता येतील.

पार्टी नंबर १

यशवंत शितोळे
अध्यक्ष
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

Maharashtra Information Technology Support Centre
Govt. Of Maha.
Regd. No.
MH - 22640

पार्टी नंबर २
प्राचार्यांचे नाव: प्रा. डॉ. गौरी मिलिंद राणे

प्राचार्य
डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे
महिला महाविद्यालय,जळगांव

डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालय
जळगांव

महाविद्यालयाचे नाव: डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय,

साक्षीदार -

१) नाव : डॉ. जयेंद्र दिनकर लेकुरवाळे,

साक्षीदार -

२) नाव : डॉ. विनोद आत्माराम नन्नवरे